महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

आदिवासी विद्यार्थ्यांना तीन वर्षापासून सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित रहावे लागल्याबाबत

(१) ५९६६ (०९-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदिवासी विभागाने अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व पूरक खर्चासाठी सन २०१०-११ पासून महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागातील असमन्वयामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना तीन वर्षांपासून महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागल्याची बाब दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेचा पैसा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून मुख्याध्यापकांच्या नावे वर्ग करण्यात आल्याने विद्यार्थ्यापर्यंत निधी पोहचला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१७-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१२-१३ व २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त सर्व अर्जांवर कार्यवाही करण्यात आलेली असून या दोन वर्षामध्ये कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित नाही.

सन २०१४-१५ मधील ४४८९० विद्यार्थ्यांचे अर्ज तांत्रिक कारणामुळे प्रलंबित असल्याची बाब खरी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात १४,४९,४३१ प्राप्त अर्जांपैकी १४,०४,५४१ विद्यार्थ्यांना दि.३१.०३.२०१५ अखेर शिष्यवृत्ती लाभ मंजूर करण्यात आला आहे.

तथापि, शिष्यवृत्तीचे प्रस्ताव शाळांकडून उशिराने प्राप्त होणे, शिष्यवृत्तीच्या अर्जात त्रुटी असणे इत्यादी तांत्रिक कारणांमुळे सुमारे ४४८९० विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित आहेत. सदर बाबींची पूर्तता झाल्यानंतर उर्वरीत अर्ज निकाली काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थी राजीव गांधी विमा योजनेपासून वंचित असल्याबाबत

(२) ६०३६ (०९-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राजीव गांधी विमा योजनेंतर्गत शासनातर्फे विमा काढण्याचा निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजी घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थी सदर विमा योजनेपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना राजीव गांधी विमा योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०९-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) दि. ११ नोव्हेंबर, २०११ नुसार राज्यामध्ये विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणारी राजीव गांधी विद्यार्थी विमा योजना बंद करण्यात येऊन ती आता शासनामार्फत राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्राह अनुदान योजना या स्वरूपात राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील शासकीय आदिवासी वसतीगृहातील मुलांना निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येत असल्याबाबत

(३) १२९८० (१०-०४-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील शासकीय आदिवासी वसतीगृहातील मुलांना निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येत असल्याने त्यांना जेवणातून विषबाधा होण्याचे प्रकार घडले असून याबाबत विद्यार्थ्यांनी उपोषण करुन जिल्हाधिकारी, धुळे व आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे तक्रार केली असूनही अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे जेवण देण्याबाबत तसेच त्यांना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१७-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.
अशा प्रकारची तक्रार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.
(२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.आवगृ-२०११ / प्र.क्र.१७१ / का-१२, दि.११.११.२०११ तसेच शुद्धीपत्रक दि.१०.०४.२०१३ व दि.२९.०६.२०१३ अन्वये निर्गमित केलेल्या नियमावलीनुसार शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना मूलभूत सोयी सुविधा व चांगल्या प्रतीचे जेवण दिले जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

धानोरा (साचलदेव) (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांस मयत दाखवून मानधन रोखल्याबाबत

(४) १३७२८ (०४-०४-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (साचलदेव) (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील शेख रहिम शे.लाल या श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांस रेकॉर्डमध्ये मयत दाखवून माहे डिसेंबर महिन्याचे मानधन रोखले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधीत लाभार्थ्यांचे तहसिल कार्यालयातील निराधार योजनेच्या विभागात संगणकीकृत रेकॉर्डमध्ये मयत दाखविल्या संदर्भात संबंधीत अधिकाऱ्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

तलाठी, धानोरा, (साचलदेव) यांनी श्री. शेख रहिम शे. लाल हे मयत असल्याचा अहवाल दिल्याने त्यांचे अनुदान रोखण्यात आले होते.
(२) सदर प्रकरणाची चौकशी केली असता, श्री.शेख रहिम शे.लाल हे जिवंत असल्याचे आढळून आल्याने त्यांचे अनुदान नियमित सुरु करण्यात आले.

तत्कालीन तलाठी, धानोरा (साचलदेव) श्री.के.डी.जाधव यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयानुसार पुसद सत्र न्यायालयात दाखल प्रकरणात त्यांच्याविरुध्द निकाल लागल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औद्योगिकदृष्ट्या मागास भागांना विदर्भ मराठवाड्यातील वीज दराप्रमाणे सवलती देण्याबाबत

(५) ५८९२० (१६-०६-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगधंद्याना वीज दरात सवलती देण्यासाठी काय करता येईल याबद्दल सविस्तर उपाय योजना सुचविण्यासाठी शासनाने मा.ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक दृष्ट्या मागास भागातील वीजेच्या वाढत्या दरामुळे तेथील उद्योगधंद्याचे विस्तारीकरण खुंटले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर शेजारी राज्यातील वीजदर हे महाराष्ट्र राज्यापेक्षा कमी आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रातील औद्योगिक वीजेचे दर इतर शेजारी राज्यापेक्षा तुलनेने जास्त असल्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०२-२०१८) : (१) विदर्भ व मराठवाडा विद्यापीठातील औद्योगिक विकासास चालना देण्यासाठी या विभागांचा इतर विभागांशी व अन्य राज्यांशी तुलनात्मक अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरिता शासनाने आंतरविभागीय समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या अहवालातील शिफारशींचे छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी निश्चित करण्यासाठी शासनाने सचिव समिती नियुक्त केली होती. सदर उपयुक्त मुख्य बाबींवर धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता शासनाने मंत्रीमंडळ उपसमिती गठित केली होती.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांना लागू असलेले वीजदर प्रथमदर्शनी अधिक असले तरी महावितरणच्या औद्योगिक ग्राहकांना उपलब्ध असणाऱ्या विविध सवलतींचा विचार करता तसेच इतर बाबींचा विचार करता हे दर शेजारील राज्यांच्या समतुल्य आहेत.

(४) उपलब्ध वीजनिर्मिती स्त्रोतांमधील भिन्नता, त्या अनुषंगाने बदलणारी वीज खरेदी किंमत, ग्राहक वर्गवारी व ग्राहकांच्या वीज वापरांमधील वैविध्य, तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्र, इ. बाबीं तसेच प्रत्येक राज्यातील नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये मोठया प्रमाणात तफावत उदा. छत्तीसगड मध्ये कोळसा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. तेथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र कोळसा खाणीच्या जवळ आहेत (पीट हेड स्टेशन्स) या उलट महाराष्ट्रातील विद्युत निर्मिती केंद्रासाठी लांबच्या राज्यातून (जसे ओरिसा इत्यादी) कोळसा आयात करावा लागतो त्यामुळे कोळसा वहनाचा खर्च वाढतो.

(५) होय, अहवालातील शिफारशी नुसार शासनाने दि. २९ जून, २०१६ च्या शासन निर्णयाव्दारे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि D व D+ विभागातील उद्योगांना चालना देण्यासाठी वीजदरात सवलत जाहीर केली आहे.

मौजे बाळापूर (ता.जि.बीड) आणि आकडे (जि.सातारा) या गावात
वीजेचा शॉक लागून मृत्यु झाल्याबाबत

(६) ६१८७९ (१८-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बाळापुर (ता.जि.बीड) येथे घरामध्ये असलेल्या मीटरमधील वायरचा प्रवाह कपडे वाळत घालण्यासाठी बांधलेल्या लोखंडी तारेत उतरल्याने सदर तारेच्या स्पर्शाने शॉक लागून एकाच कुटूंबांतील वडिलांसह दोन मुलांचा मृत्यु झाल्याची घटना माहे जून, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सातारा जिल्हयातील आकडे गावांत विजेच्या धक्क्याने दोन शेतकऱ्यांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ११ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) उपरोक्त दोन्ही प्रकरणी विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. पहिल्या घटनेमध्ये कपडे वाळत घालण्यासाठी वापरलेली जी.आय. वायर व सर्विस वायरच्या आधारासाठी वापरलेली जी आय. वायर यांचा सर्विस वायरच्या उघडया जॉईंटशी संपर्क आल्याने जी.आय. वायर विद्युत भारीत झाली व तिच्या संपर्कात एकाच कुटुंबातील वडील व दोन मुलांचा मृत्यू झाला. त्यांच्या नजीकच्या नातेवाईकास प्रत्येकी रु. २०,०००/- असे एकूण रु. ६०,०००/- तात्काळ आर्थिक मदत म्हणून म.रा.वि.वि. कंपनीने अदा केली आहे.

दुसऱ्या घटनेमध्ये कै. शरद शिंदे व कै. भास्कर गुजाले हे श्री. मोहन नलवडे यांच्या शेतात मशागतीचे काम करण्यासाठी गेले असता त्यावेळेस शेतात पडलेली टी.व्ही. केबलची वायर व सर्विस वायरच्या उघडया जॉईंटच्या संपर्कात आल्याने विद्युत भारित जी.आय.वायर (आधाराला जोडलेली) उचलताना वीजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात घडला आहे.

सदर अपघातात मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसदारांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार तातडीची मदत प्रत्येकी रु. २०,०००/- दि. ३०/०६/२०१६ रोजी अदा करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसानभरपाईची रक्कम महावितरण कंपनीच्या नियमानुसार अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तिजापूर, तरोडा (ता.तिवसा,जि.अमरावती) येथील झोपडपट्टी ते स्मशानभूमीपर्यंत विद्युत पोल पथ दिव्यासह बसविणेबाबत

(७) ६८०३७ (१७-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तिजापूर, तरोडा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील झोपडपट्टी ते स्मशानभूमीपर्यंत विद्युत पोल पथ दिव्यासह बसविणेसाठी अंदाजपत्रक सादर करण्याबाबत ग्रामीण विभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या. अमरावती यांनी उप कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. तिवसा उपविभाग यांना दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास कळविले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे काय,
(३)असल्यास, उक्त काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१८) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर अंदाजपत्रक DPDC (ND/SI) योजनेअंतर्गत विभागीय कार्यालय, अमरावती ग्रामीण यांचेकडून दि.१७.०१.२०१७ रोजी तांत्रिकदृष्ट्या मंजूर करण्यात आले आहे. प्रस्तुत

अंदाजपत्रकानुसार प्रशासकीय मान्यतेकरिता व निधीचे उपलब्धतेकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि.२३.०१.२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु निधी प्राप्त न झाल्यामुळे पुन:श्च प्रस्ताव सन २०१७-१८ साठी सादर करण्यात आला असून निधी व मंजुरी प्राप्त होताच काम पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे ३३/११ के.व्ही. विद्युत सब स्टेशन होण्याबाबत

(८) ७३०७१ (१०-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे ३३/११ के.व्ही. विद्युत सब स्टेशन होणेकरीता मा.उर्जा मंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सब स्टेशन होणेबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश मुख्य अभियंता, कोल्हापूर विभाग यांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१८) : (१) भुदरगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) आकुर्डे येथे ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र होणेकरिता बैठक घेण्यात आली नव्हती. तथापि, आकुर्डे येथे अतिउच्चदाब विद्युत उपकेंद्र होणेकरिता मा.मंत्री, ऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता, महावितरण, परिमंडल कार्यालय, कोल्हापूर यांची दिनांक २३.०८.२०१६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे बैठक घेण्यात आली होती.
(२) आकुर्डे येथे अतिउच्चदाब विद्युत उपकेंद्र करणेबाबतचा तांत्रिक सुसाध्यता व योग्यता तपासून प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले होते.
(३) आकुर्डे येथे १३२/३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारणीचा प्रस्ताव महापारेषण (MSETCL) कंपनीकडे सादर करण्यात आला असता महापारेषण कंपनीने केलेल्या तपासणीनुसार सद्यस्थितीत आकुर्डे येथे १३२/३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्र प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ब्रम्हा सहकारी गृहनिर्माण संस्था(ता.चिखली, जि.बुलडाणा) या संस्थेला शासनाने कर्ज दिल्याबाबत

(९) ७७११४ (२१-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हा सहकारी गृहनिर्माण संस्था (ता.चिखली, जि.बुलडाणा) या संस्थेला शासनाने कर्ज दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संस्थेचे संचालक मंडळ हे चिखली येथे स्थायिक नसून सदर संस्थेने सभासदांना सदनिका न देताच कर्ज वसूली केली असून त्याबाबत सभासदांचे सर्व्हीस बुकमध्ये नोंद घेतल्याने त्यांना निवृत्ती वेतन मिळणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही, मात्र सदर संस्थेस गट विमा योजने अंतर्गत सन २००७ मध्ये रु.१, १९,७७, ५००/- इतके कर्ज मंजूर करण्यात आले असुन त्यापैंकी रु, ८२,९८,१६०/- इतके कर्ज वितरित करण्यात आले आहेत.
(२) सदर संस्थेचे संचालक मंडळ ५ सदस्यीय असून त्यापैंकी २ चिखली येथे स्थायिक आहेत. तर ३ सदस्यांबाबत स्पष्ट बोध होत नाही. संस्थेत एकूण २१ सभासद असून त्यापैकी १६ सभासदांना शासनाकडून कर्ज मंजूर करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार सभासदांचे कर्ज मंजूरीनंतर त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात येऊन कर्ज वसुलीची कार्यवाही संबंधित कार्यालय प्रमुखांमार्फत त्यांच्या वेतनातून करण्यात येते. सभासदाच्या निवृत्ती दिनांकापर्यंत कर्जाची व्याजासह वसूली न झाल्यास सभासदाकडे प्रलंबित असलेल्या रक्कमेइतकी रक्कम उपदानामधून राखून ठेवण्यात येते.
(३) व (४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने यासंदर्भात चौकशी करण्यासाठी विशेष लेखापरीक्षक वर्ग २ (फिरते पथक), सहकारी संस्था, बुलढाणा यांची नियुक्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुका कष्टकरी शेतमजूर संघटनेने विविध मागण्यांसाठी तहसिल कार्यालयावर काढलेला मोर्चा

(१०) ७८४९५ (१४-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ तालुका कष्टकरी शेतमजूर संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी शिरोळ (जि.कोल्हापूर) येथे तहसिल कार्यालयावर दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संघटनेने कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत,
(३) असल्यास, या मागण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) संघटनेने केलेल्या मागण्या व त्यावर शासनाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

संघनेच्या मागण्या	शासनाने केलेली कार्यवाही
१. संजय गांधी योजनेची मिटींग सहा महिने झालेली नसणे,	संजय गांधी योजनेच्या दि.०७/१२/२०१६, ७/०१/२०१७ व २८/६/२०१७ रोजी बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये अनुक्रमे ७३५, १३६ व ८४७ प्रकरणे मंजूर करण्यात आली.
२. तिसरा महिना संपत आला तरी, लाभार्थ्यांना पेंशन न मिळणे,	माहे जुलै व ऑगस्ट, २०१६ या दोन महिन्याचे अनुदान सप्टेंबर, २०१६ मध्ये बँकेत जमा करण्यात आले आहे.
३. वाढीव पेंशन न मिळणे,	लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
४. संजय गांधी विभागात सावळा गोंधळ व मनमानी कामकाज चालू असणे, त्यामुळे लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ येणे, संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे,	संजय गांधी, इंदिरा गांधी व श्रावणबाळ यांचे २९६०, २२७७ व २१७४ एवढे लाभार्थी असून त्यापैकी अनुक्रमे २९३६, २२१० व २१३१ इतक्या लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. तथापि, अनुक्रमे २४, ६७ व ४३ लाभार्थ्यांचे हयातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अनुदान वाटप करण्यात आलेले नाही.
५. सेतूमध्ये उत्पन्नाचे दाखले वेळेवर मिळत नाहीत,	संबंधित सेतूचालक यांना लेखी सूचना तहसिलदार, शिरोळ यांचे स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.
६. दत्तवाड व शिरोळ या ठिकाणी डॉक्टरांच्या मनमानी कारभारामुळे वैद्यकीय दाखले वेळेवर न मिळणे,	ग्रामीण रुग्णालय, शिरोळ येथील डॉ.कुंभोजकर यांनी मागणी करणाऱ्या लाभार्थ्यांना मंगळवार व गुरुवार या दोन दिवसामध्ये दाखले दिले जातील असे मान्य केले आहे.
७. रेशन धारक दुकानदाराकडून कमी प्रमाणात धान्य मिळणे व नवीन रेशन कार्ड न मिळणे	अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटूंब लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती ३ किलो गहू व २ किलो तांदूळ तसेच अंत्योदय लाभार्थ्यांना प्रतिकार्ड २१ किलो गहू व १४ किलो तांदूळ देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभाग, शासन निर्णय, दि.१५ जानेवारी, २०१६ अन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शिधापत्रिका धारकांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे सध्या नविन व अन्न सुरक्षा योजनेत समावेश नसलेल्या शिधापत्रिका धारकांचे धान्य वाटप बंद आहे.
८. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतमजूरांना वाढीव धान्य मिळणेबाबत	
९. दारिद्ररेषेची यादी जाहीर करणे इ.	दारिद्रय रेषेचा सर्व्हे सन २००२-२००७ मध्ये झाला असून, त्यामध्ये ग्रामीण भागातील एकूण १०,४६७ कुटूंब आहेत व त्याची गावपातळीवर यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

गडचिरोली जिल्ह्यातील महावितरणच्या कंपनीचे मंजुर सब स्टेशनच्या निर्मीतीला विलंब लागल्याबाबत

(११) ७९८४६ (०९-०५-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील मौजा-पुराडा (ता.कुरखेडा) मौजा-कोटगुल (ता.कोरची) मौजा-वडधा (ता.आरमोरी) व मौजा-येणापूर (ता.चामोर्शी) येथे राज्य विदयुत वितरण कंपनीने सब स्टेशनच्या निर्मितीला मंजुरी प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येणापूर येथील सब-स्टेशन उभारणीस होत असलेल्या विलंबाबाबत स्थानिक पंचायत समितीच्या सदस्याने केलेल्या तक्रारीवर मा.मुख्यमंत्री महादेयांनी व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे आढावा घेऊन तातडीने सब-स्टेशन उभारणीचे आदेश दिले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, येणापूर तसेच जिल्ह्यातील इतरही मंजुर सब-स्टेशनच्या उभारणीला विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये मौजा पुराडा, ता.कुरखेडा येथे ३३/११ के.व्ही. नवीन उपकेंद्र दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना मध्ये मंजूर करण्यात आले आहे.

मौजा-कोटगुल, ता.कोरची व मौजा येणापूर, ता.चामोर्शी येथे नवीन उपकेंद्रे कृषिपंप अनुशेष योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेली आहेत.

मौजे वडधा, ता.आरमोरी येथील ३३/११ के.व्ही.उपकेंद्र महावितरण कंपनीतर्फे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे येणापूर, ता.चामोर्शी येथे नवीन ३३/११ के.व्ही उपकेंद्र दि. २७.०७.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

मौजा पुराडा, ता.कुरखेडा येथील उपकेंद्र दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेमध्ये मंजूर करण्यात आले होते. परंतु तांत्रिक कारणास्तव सदर उपकेंद्र मौजा कढोली, ता.कुरखेडा येथे प्रस्तावित करण्यात आले असून निविदा प्रक्रियेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

मौजे कोटगुल येथील उपकेंद्रास लागणारी ३३ के.व्ही.ची वाहिनी घनदाट जंगलातून जात असल्याने देखभाल करणे अशक्य आहे. त्यामुळे सदर उपकेंद्राचा प्रस्ताव रद्द करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील अपंगांच्या विविध समस्यांबाबत

(१२) ७९९९१ (२४-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगांच्या पुर्नवसनासाठी १९९५ चा कायदा लागू असताना बुलढाणा जिल्ह्यातील अपंगाच्या समस्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासनाकडून मार्गी लागत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील अपंगाच्या समस्या मार्गी लावण्यासाठी संघटनेने दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त निवेदनानुसार अपंगाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२०-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) प्रहार अपंग क्रांती संघटनेने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे बुलढाणा जिल्ह्यातील अपंगाच्या समस्या मार्गी लावणे विषयी निवेदन सादर केलेले आहे.

(३) जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने दि.२८.०२.२०१७ रोजी बैठक आयोजित करुन अपंगाच्या प्रश्नांबाबत संबधीत अधिकारी व खातेप्रमुख यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सदर बैठकीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व खातेप्रमुख यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील उपसा सिचंन योजनेला विद्युत पुरवठा होत नसल्याबाबत

(१३) ८३१०७ (२८-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात कालवा सिचंनापेक्षा विहीर व कुपनलिकेच्या माध्यमातून उपसा सिचंन जास्त प्रमाणात होत आहे परंतु उपसा सिचंन करण्यासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी उपसा सिंचन योजनेला तात्काळ वीज उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१८) : (१) व (२) वाशिम जिल्ह्यात उपसा सिंचनासाठी संभाव्य कृषीपंपाना "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी" या योजनेद्वारे वीज पुरवठा देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोबाईल मनोऱ्यांसाठी औद्योगिक दरानुसार देयक आकारल्याबाबत

(१४) ८५७६६ (०९-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोबाईल मनोऱ्यांसाठी वाणिज्यिक ग्राहकांना आकारण्यात येणा-या विज देयकांनुसार देयकाची आकारणी करण्याऐवजी औद्योगिक दरानुसार देयक आकारले गेले असल्याने त्यातून शासनाचे २ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबाईल मनोऱ्यांना वीज सवलत देण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत जबाबदार असणाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१८) : (१) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर आदेशानुसार शासनाच्या आयटी आयटीईएस पॉलिसी अंतर्गत कायम नोंदणीकृत घटकांना औद्योगिक दराने वीज आकारणी करण्यात येते. परंतु नोंदणी नसल्यास, व्यावसायिक दरानुसारच वीज बिलाची आकारणी करण्यात येते. त्यामुळे महावितरण कंपनीचे नुकसान झालेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागात राबविल्या गेलेल्या विविध प्रशिक्षण योजनांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

(१५) ८६०६४ (०९-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अध्यक्ष, आदिवासी समिती प्रमुख यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे आदिवासी विकास विभागात राबविल्या गेलेल्या आचारी प्रशिक्षणासह विविध प्रशिक्षण योजनांमध्ये प्रचंड आर्थिक

गैरव्यवहार झाल्याची तक्रार करून या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी लेखी तक्रार मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ या वर्षात अमरावती येथील यशवंत मानव विकास प्रशिक्षण बहुउद्देशीय संस्थेकडे विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत आदिवासी समाजातील युवक, युवती, महिला यांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी सोपवून अमरावती, नागपुर, नाशिक व ठाणे या चार अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग यांच्याकडे या प्रशिक्षणावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रति प्रशिक्षणार्थी ४७,२०५ रुपये देयक काढण्यात आले असून या माध्यमातून प्रचंड आर्थिक गैरव्यवहार झाला असून अशी किती देयके या चार जिल्हयातील किती प्रशिक्षणार्थींच्या नावे काढण्यात आली आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीतून काय निष्पन्न झाले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२०-०२-२०१८) : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) प्रति प्रशिक्षणार्थी रु. ४७,२०५/- प्रमाणे एकुण ४०० लाभार्थ्यांसाठी रु.१८८.८२ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला असून यापैकी रु. १५१.९७ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे.

(४) व (५) या प्रकरणी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्मचारी दोषी आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

हिंगोली जिल्हयात थकित विज देयकांमुळे सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या मोटारींची वीज जोडणी खंडित केल्याबाबत

(१६) ८६८९८ (०९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात थकित विज देयकांमुळे अनेक गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा करणाऱ्या मोटारींची वीज जोडणी खंडित केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान कार्यकारी अभियंता, महावितरण, हिंगोली यांना निवेदनाद्वारे निदर्शनास आणण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, सदरहू मोटारींची वीज जोडणी पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) सदर घटनेची महावितरण कंपनीमार्फत चौकशी केली असता माहे एप्रिल, २०१७ मध्ये ६४३ पाणी पुरवठा ग्राहकांपैकी ३४४ ग्राहकांकडे वीज देयकाची थकबाकी असल्याने त्यांचा वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला होता.
(३) ज्या ग्राहकांनी चालू वीज देयकाचा भरणा केलेला आहे अशा ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आलेला आहे. तसेच थकबाकी असणाऱ्या ग्राहकांपैकी एकूण ५५ पाणी पुरवठा ग्राहकांनी चालू वीज देयकाचा भरणा केल्यामुळे त्यांच्या पाणी पुरवठा योजनांना वीज पुरवठा जोडून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वीज वाहिन्यांचे
खांब व तारांची दुरुस्ती करण्याबाबत

(१७) ८७२३८ (०९-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वीज वाहिन्याचे खांब वाकलेले असल्याचे व विद्युत तारा जमिनीच्या दिशेने लोंबकळत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय ,पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर खांब व तारांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) चंदगड तालुक्यात (जि. कोल्हापूर) देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत सदरचे वाकलेले पोल सरळ करणेकरिता विभागीय कार्यालयीन स्तरावर निविदा काढलेल्या असून त्याद्वारे सदरचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

सन २०१६-१७ मध्ये २७७ मोडकळीस आलेले/वाकलेले पोल सरळ करण्यात आले व ११ कि.मी. तारांचा ताण सुस्थितीत करण्यात आला. तसेच सन २०१७-१८ मध्ये १६ मोडकळीस आलेले/वाकलेले पोल सरळ करण्यात आले व ५.४२ कि.मी. तारांचा ताण सुस्थितीत करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील अपंग, विधवा, वृध्द लाभार्थ्यांना अनुदान देण्याच्या योजनेत झालेला गैरव्यवहार

(१८) ८७२८६ (१८-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील अपंग, विधवा, वृध्द लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान निराधारांना घरपोच उपलब्ध करुन देण्याचे काम आयसीआयसी बँकेमार्फत नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडून विविध कारणे देवून केले जात नसल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयसीआयसी बँकेमार्फत नेमलेल्या कर्मचा-यांकडून लाभार्थ्यांची फसवणूक करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच लाभार्थ्यांना वेळीच रक्कम घरपोच मिळण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०३-०२-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

बागलाण तालुक्यातील (जि.नाशिक) शहर आणि परिसरातील नागरिकांना विद्युत देयके वेळेत मिळण्याबाबत

(१९) ८७३०९ (०९-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण तालुक्यातील (जि. नाशिक) नामपूर शहर आणि परिसरातील नागरिकांना विद्यूत देयकांचा भरणा करण्याच्या अंतिम दिवशी देयक मिळत असल्याचे माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार ग्राहकांना विद्युत देयके विहित मुदतीत भरता यावीत म्हणून विद्यूत देयके वेळेवर मिळावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

सदर कालावधीमधील विद्युत देयके, भरणा करण्याच्या अंतिम तारखेनंतर, मिळाल्याची कुणाही वीज ग्राहकांची तक्रार महावितरणच्या स्थानिक कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कृषिपंपाना वीज सवलत देण्याबाबत

(२०) ८७४९३ (०९-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेती पंपाच्या वीज दरात महाराष्ट्र राज्य विद्यूत नियामक आयोगाने गत तीन वर्षात २७४ टक्के दर वाढ लागू केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यामुळे शेतक-यांचे वीज दर किमान दुप्पट ते तिप्पट होणार असून शासनाने त्वरीत शेती पंपाच्या वीजदरात सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१८) : (१) मा.आयोगाच्या दि. ०३.११.२०१६ च्या वीजदर आदेशानुसार एकूण सरासरी वीजदर वाढ केवळ १.२०% ते २.००% इतकी झाली आहे.

(२) सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० साठी मा. आयोगाने निश्चित केलेल्या दरानुसार विना मीटर कृषी ग्राहकांच्या वीज दरात अनुक्रमे ५.२%, ५.२%, ४.६% व मीटर असलेल्या कृषी ग्राहकांच्या वीज दरात अनुक्रमे ३.५%, ३.४% व ४.२% इतकी वाढ होणार आहे. शासन निर्णय दि. ११.१०.२०१२ नुसार कृषीपंप ग्राहकांना वीज दर सवलतीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कृषिपंप (सहकारी पाणीपुरवठा संस्था) यांचे वाढीव वीज दर कमी करण्याच्या मागणीबाबत

(२१) ८७५२५ (०९-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषिपंप (सहकारी पाणीपुरवठा संस्था) यांचे वाढीव वीज दर कमी करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे इरिगेशन फेडरेशन, कोल्हापूर यांनी दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) दि. २४/०८/२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये यासंदर्भात दिलेल्या निदेशानुसार राज्यातील उपसा सिंचन योजनेच्या ग्राहकांना दि. १/११/२०१६ पासून रु. १.२६ प्रती युनिट हा सवलतीचा वीजदर आकारण्याबाबत महावितरण कंपनीकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जानेफळ (जि.बुलढाणा) येथील सवणा गावाच्या पूर्व शिवारात महावितरण कंपनीमार्फत बसविण्यात आलेले खांब निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२२) ८७९८९ (०९-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जानेफळ (जि.बुलढाणा) येथून जवळच असलेल्या सवणा गावाच्या पूर्व शिवारात महावितरण कंपनीमार्फत खाजगी कंत्राटदाराला दोन रोहित्रे बसविण्याचे देण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे तसेच माहे मे, २०१७ च्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे चार विद्युत खांबही कोसळले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबधित शेतक-यांनी महावितरणकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) सदर बाब सवणा गावातील नसून लावणा गावातील आहे.
(२) हे खरे आहे.
(३) श्री. श्रीकृष्ण काकडे, मु.पो. जानेफळ, ता. मेहकर यांनी मा.उपलोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या सुनावणीनुसार महावितरणच्या स्थानिक अभियंत्यास सदरहू कामातील त्रुटी दूर करण्याकरिता आदेशित करण्यात आले. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराकडून त्रुटी दुरुस्त करुन घेण्यात आल्या आहेत.

तसेच माहे मे, २०१७ च्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे मेहकर उपविभागांतर्गत आठ विद्युत खांब कोसळले असल्याचे निदर्शनास आले होते व त्याचे पुर्नउभारणीचे काम करण्यात

आलेले असून लघुदाब वाहिनीचे दोन विद्युत खांब पुर्नउभारणीचे काम प्रलंबित आहे. सदरचे काम करण्यासाठी कंत्राटदारास आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील घरगुती मीटर रिडींग वेळेवर न घेतल्याबाबत

(२३) ८८५९० (०९-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, आटपाडी, तासगांव, कडेगांव व पलुस (जि.सांगली) तालुक्यातील घरगुती वीज मीटरचे रिडींग प्रत्येक महिन्याला न घेता ४५ ते ५० दिवसांनी घेत असल्याची तक्रार माहे मे, २०१७ च्या सुमारास ग्राहकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.
सांगली जिल्ह्यांतर्गत आटपाडी, कडेगांव, पलुस व तासगांव या तालुक्यातील घरगुती वीज कनेक्शनचे रिडींग घेण्यासाठी महावितरणमार्फत खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यात आली असून सदर एजन्सीद्वारे प्रत्येक महिन्यास रिडींग घेऊन ग्राहकांना वीज बिलाची आकारणी करण्यात येते
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड तालुक्यात (जि.औंरगाबाद) महावितरण कडून शेतक-यांची जळालेली रोहित्रे बदलुन मिळत नसल्याबाबत

(२४) ८८८४७ (२४-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड तालुक्यात (जि.औंरगाबाद) महावितरण कडून शेतक-यांची जळालेली रोहित्र लवकर बदलुन मिळत नसल्याचे माहे मे, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शेतक-यांनी अनेक दिवसापासून वीज कनेक्शनचे पैसे भरुनही प्रशासनाकडून बदलुन मिळण्याबाबत दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी करुन येथील शेतक-यांच्या वीजविषयक समस्यांचे जलदगतीने निराकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) औरंगाबाद परिमंडळाअंतर्गत औरंगाबाद ग्रामीण मंडळातील सिल्लोड उपविभागामध्ये एकूण १५८४ वितरण रोहित्रे कार्यरत आहेत. माहे एप्रिल, २०१७ मध्ये ११ वितरण रोहित्रे तात्काळ ४८ तासात बदलण्यात आली व उर्वरित ३ वितरणे रोहित्रे ७-१७ दिवसाच्या अंतराने बदलण्यात आली. माहे मे, २०१७ मध्ये २९ वितरण रोहित्रांपैकी १३ वितरण रोहित्रे १ ते ४ दिवसांच्या अंतराने बदलण्यात आली असून उर्वरित १६ वितरणे रोहित्रे ५ ते २० दिवसांच्या अंतराने बदलण्यात आली आहेत. औरंगाबाद ग्रामीण मंडळाअंतर्गत सप्टेंबर, २०१७ अखेर एकूण २,१७,१२२ कृषी ग्राहक असून त्यांच्याकडे एकूण सुमारे रु. १४८३ कोटी इतकी वीज बिल थकबाकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील राजापूर लांजा तालुक्यातील विदयुत खांब गंजलेले असून वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

(२५) ८८९३५ (०९-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील राजापूर लांजा तालुक्यातील ठिकठिकाणी बसविण्यात आलेले विदयुत खांब जुने व गंजलेले असल्यामुळे वारंवार विज पुरवठा खंडित होत असून सदर गंजलेले खांब कोणत्याही क्षणी कोसळून मोठी जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विदयुत खांब बसविण्याचे कंत्राट घेणारे प्रकाश इलेक्ट्रिकल, चिपळून यांना वारंवार विद्युत खांब बदलण्याबाबत लेखी कळवूनही अदयापी कोणतीच दखल घेण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर गंजलेले विद्युत खांब तात्काळ बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) रत्नागिरी जिल्हयातील खाऱ्या व दमट हवामानामळे राजापूर व लांजा तालुक्यातील लोखंडी वीजेचे खांब गंजण्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर होत असते. महावितरणकडून असे गंजलेले खांब बदलण्याचे काम निरंतर चालू असते. गंजलेले वीज खांब बदलताना त्या भागातील वीजपुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

पोल बदलण्याचे कंत्राट महावितरणमार्फत इन्फ्रा भाग १ योजनेअंतर्गत मे.प्रकाश इलेक्ट्रीकल, चिपळूण यांना देण्यात आलेले होते व त्याअंतर्गत राजापूर, लांजा तालुक्यातील जैतापूर, दळे, हातिवले, केळवली, मोसम, भू राजापूर इत्यादी गावांमध्ये एकूण १६६६ पोल यापूर्वी बदलण्यात आले आहेत. तसेच सध्या चालू असलेल्या आय.पी.डी.एस. व पं. दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती या दोन्ही योजनेअंतर्गत लांजा व राजापूर तालुक्यामध्ये २८० पोल बदलणे प्रस्तावित असून त्याचे कंत्राट मे.प्रकाश इलेक्ट्रीकल्स, चिपळूण यांना दिले आहे. सद्यस्थितीत राजापूर शहरामध्ये ४० पोल बदलविण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयासह राज्यात संजय गांधी निराधार योजनेचे
अनुदान कर्ज ऑनलाईन घेण्याबाबत

(२६) ८९०१४ (०९-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयासह राज्यात संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळावा यासाठी अनुदानाचे कर्ज ऑनलाईन घेण्यात येणार असून त्यामुळे प्रत्येक लाभार्थ्याला ३५ रुपयांचा अधिभार द्यावा लागणार असल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्ज मंजूरीबाबत कोणती पध्दत अवलंबणार आहे याची माहिती अद्याप नागरीकांना नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या लाभाबाबत महसूल, ग्रामपंचायत, ग्रामसभा इ.माध्यमातून जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३१-०१-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या माहिती / प्रसार /प्रसिध्दीकरीता फलक लावणे, दवंडी देणे, विविध माध्यमांद्वारे प्रसिध्दी देणे यांचा वापर करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नालासोपारा (जि.पालघर) येथील महावितरणच्या सुरु असलेल्या गैरप्रकारांबाबत

(२७) ८९४२८ (२४-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) येथे महावितरणच्या अवास्तव वीजदेयक येणे, मुदत संपल्यानंतर देयके प्राप्त होणे, मीटरचे फोटो न घेता देयके देणे अशा गैरप्रकारांमुळे ग्राहकांची गैरसोय होत असून याबाबत तातडीने दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी शासनाकडे येथील नागरिकांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) माहे एप्रिल, २०१७ मध्ये वीज देयके वेळेवर न मिळणे, वीज देयकावर मिटरचा फोटो नसणे याबाबतच्या काही तक्रारी महावितरणच्या नालासोपारा येथील स्थानिक कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या.
(२) महावितरण कंपनीकडून शहानिशा करुन चुकीची देयके गेलेल्या ग्राहकांना वीज देयके दुरुस्त करुन देण्यात आलेली आहेत.
(३) मीटर वाचन घेणाऱ्या व वीज बिल वाटप करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असून, सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयातील शेरी येथे वीज वितरण कंपनीने गावाला पाणीपूरवठा करणाऱ्या योजनेचा वीजपुरवठा खंडीत केल्याबाबत

(२८) ९०४८९ (०९-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील शेरी येथे दोन लाख रुपयांचे वीज देयक थकल्याने वीज वितरण कंपनीने गावाला पाणीपुरवठा करणा-या योजनेचा वीजपुरवठा खंडित केल्याने गावात पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, ही खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा तात्काळ सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०२-२०१८) : (१) व (२) अकोला जिल्हयातील शेरी (बुद्रुक), ता.तेल्हारा येथील दोन पाणी पुरवठा योजनांचे थकीत वीज बिल प्रत्येकी सुमारे रु.२ लाखाच्या थकीत वीज देयकाचा भरणा रितसर नोटीस देऊनही न केल्यामुळे कंपनीच्या नियमानुसार दिनांक २७.१०.२०१७ रोजी महावितरणच्या स्थानिक कार्यालयाकडून वीज पुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला होता. थकीत वीज बिलाच्या रकमेपैकी थोडया रक्कमेचा भरणा

केल्यामुळे सदर योजनांचा वीज पुरवठा माहे ११.११.२०१७ मध्ये हमीपत्र घेऊन सुरु करण्यात आला होता. परंतु हमी पत्रानुसार उर्वरित थकबाकीचा हप्ता व चालू बील न भरल्यामुळे दिनांक ३१.०१.२०१८ रोजी दोन्ही पाणीपुरवठा योजनांचा विद्युत पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी (जि.वर्धा) नगरपरिषदेच्या तत्कालीन नगराध्यक्षांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे विविध योजनांचा लाभ घेतल्याबाबत

(२९) ९१४७६ (२३-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) नगरपरिषदेच्या तत्कालीन नगराध्यक्षांची आर्थिक परिस्थिती सबळ असतांनाही बनावट कागदपत्राच्या आधारे कमी उत्पन्न दाखवून बीपीएल धारकाचे प्रमाणपत्र प्राप्त केले व या बनावट प्रमाणपत्राच्या आधारे श्रावणबाळ योजनेसह विविध योजनेचा लाभ घेऊन त्यांनी शासनाची फसवणूक केली असल्याची माहिती दिनांक ४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१८) : (१) व (२) तत्कालीन नगराध्यक्ष, श्रीमती उषा रामचंद्र अर्जापूरे यांनी श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेकरीता अर्ज केला होता. सदर अर्जावर संजय गांधी निराधार अनुदान समितीने कागदपत्राच्या आधारे प्रकरण मंजुर केले. परंतु वर्तमान पत्रातील बातमीवरुन सदर प्रकरणाचे पुनर्विलोकन करुन पुनर्विलोकनानंतर प्रकरण नामंजूर करण्यात आले.

श्रीमती अर्जापूरे तत्कालीन नगराध्यक्ष, नगरपरिषद, आर्वी यांनी अर्जासोबत जोडलेले बीपीएल प्रमाणपत्र तपासले असता, सदर प्रमाणपत्र हे नगरपरिषद आर्वी येथील मूळ बीपीएल यादीच्या आधारावर दिल्याचे दिसून येते. मूळ बीपीएल यादीत सुध्दा त्यांचे कुटुंब समाविष्ट असल्याचे दिसून आले आहे. तद्नंतर श्रीमती अर्जापूरे यांनी सदर योजनेचे लाभार्थी म्हणून कोणत्याही प्रकारचा लाभ घ्यायचा नाही, याबाबत केलेल्या विनंतीनुसार पुनर्विलोकन करुन त्यांचे लाभ बंद करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात वीजेचे खांब व तारा जीर्ण झाल्याबाबत

(३०) ९१७२८ (०९-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीज पुरवठा करणारे खांब वाकले असून ते पडण्याच्या स्थितीत आहेत तसेच वीजवाहक तारा लोंबकळत असून याबाबतच्या तक्रारी वारंवार संबधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज तारांचा धक्का लागून लोकांचा मृत्यू होण्याची शक्यता असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) याबाबतच्या तक्रारी/सूचना तोंडी स्वरुपात महावितरणच्या खामगांव विभागीय कार्यालयास तसेच लोणार उपविभागीय कार्यालयास लोणार तालुक्यातील नागरिकांकडून तथा वीज ग्राहकांकडून करण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) वीज तारांचा धक्का लागून लोकांचा मृत्यू होण्याची शक्यता असलेले दोषयुक्त स्थळांचे निरीक्षण करुन देखभाल दुरुस्ती करण्याकरिता लोणार उपविभागांसाठी रु.७.०१ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. लोणार उपविभागीय कार्यक्षेत्रात तातडीने देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कंत्राट देण्यात आलेले असून सदरहू कंत्राटदारामार्फत देखभाल दुरुस्ती आवश्यक असलेल्या स्थळांचे दुरुस्ती काम करुन घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये लघुदाब वाहिनी खांब-३६, उच्चदाब वाहिनी खांब-१६, उच्चदाब वाहिनी-४.६० किमी व लघुदाब वाहिनी-८.३५ किमी इ. कामांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील विजेचे खांब धोकादायक बनल्याबाबत

(३१) ९२०७२ (०९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ११६६ विजेचे खांब गंजलेले असून धोकादायक बनले असून ते तात्काळ बदलणे गरजेचे असून ते न बदलल्यास जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणच्या यु ॲण्ड एम योजनेतून पोल बदलणे बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे धोकादायक विजेचे गंजलेले खांब बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१८) : (१) माहे सप्टेंबर, २०१७ अखेर शाहुवाडी तालुक्यामध्ये एकूण ९०१ गंजलेले पोल बदलण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत प्राधान्याने सुरु आहे.

(२) यु ॲण्ड एम योजनेतून ७ पोल बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे व ८९४ पोल बदलण्याचे काम डोंगरी तालुक्यातील वितरण प्रणाली सुधारणा या योजनेअंतर्गत करण्यात येणार आहे.

(३) सदर कामांचा कार्यादेश यु ॲण्ड एम योजनेअंतर्गत मे. टेकलिड इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि. पुणे यांना देण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ८९४ पोलचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भातकुली, अमरावती, मोर्शी व तिवसा या तालुक्यात वीज पुरवठा सुरळीत व नियमित होण्याबाबत

(३२) ९२२७७ (०९-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली, अमरावती, मोर्शी व तिवसा या तालुक्यात वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असून कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि. कंपनी मर्या. अमरावती यांना वांरवार लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजपुरवठा सुरळीत व नियमित होण्याबाबत अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) माहे मे व जून, २०१७ मध्ये वादळी पावसामुळे भातकुली, अमरावती, तिवसा वा मोर्शी तालुक्यामध्ये व उच्चदाब वाहिनीचे पोल वाकल्याने तसेच पोलवरच्या तारा तुटल्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता. परंतु सदर परिसरातील तुटलेल्या तारा जोडण्याचे व पोल सरळ करण्याचे काम युध्द पातळीवर पूर्ण करुन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला व कमी दाबाच्या वीज पुरवठयासंदर्भात अमरावती ग्रामीण, तिवसा, भातकुली व मोर्शी २ उपविभागातील एकूण १९१ नवीन रोहित्रांची कामे करण्यात आली. त्यामध्ये कृषीपंप विशेष योजनेअंतर्गत १४०, पायाभूत आराखडा योजनेअंतर्गत ४२, विशेष घटक योजनेअंतर्गत ९ असे एकूण १९१ रोहित्रांची उभारणी करण्यात आली. तसेच कृषि पंप वीज वाहिनी विलगीकरणाचे काम पं. दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती या योजनेत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे रिडींग न घेताच विद्युत देयके पाठविल्यामुळे नागरिकांनी काढलेला मोर्चा

(३३) ९२७५९ (०९-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी शहरासह ग्रामीण भागातील विज मीटरची रिडींग घेण्याचे काम उमरेड (जि.नागपूर) येथील एका कंत्राटदारास देण्यात आले आहे मात्र कंत्राटदार रिंडीग घेण्यास येत नाही तसेच ग्राहकांना अवास्तव देयके पाठविण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही नागरिकांनी विज देयकांची दुरूस्ती करून मागितली असता विज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आधी देयक भरा नंतर दुरूस्ती करून देवू अशी भुमिका घेतल्यामुळे नागरिकांनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी, ब्रम्हपूरी या कार्यालयावर मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, यानुसार नागरिकांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) ब्रम्हपूरी विभागाअंतर्गत महावितरणच्या कुठल्याही अधिकाऱ्यांनी आधी देयक भरा व नंतर वीज बिलाची दुरुस्ती करु अशी भूमिका घेतलेली नाही. तसेच दिनांक २९.०६.२०१७ रोजी मा.लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली सुमारे १५० लोकांचा मोर्चा ब्रम्हपुरी विभागीय कार्यालय येथे आलेला होता. मोर्चामध्ये चुकीचे वीज देयक तसेच वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्याबाबत अधिक्षक अभियंता, गडचिरोली विभाग व कार्यकारी अभियंता, ब्रम्हपूरी विभाग यांनी मोर्चेकऱ्यासोबत चर्चा केली.

(३) व (४) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आलेली असून, त्यात जून, २०१७ ते सप्टेंबर, २०१७ दरम्यान एकूण ३१७ चुकीच्या आकारणीची वीज देयके दुरुस्त करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माणकेश्वर (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे ३३ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याबाबत

(३४) ९३१३२ (१८-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणकेश्वर (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे ३३ के.व्ही. उपकेंद्र मंजूर असून सदरील उपकेंद्राकरिता भूसंपादन माहे जुलै, २०१६ मध्ये करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तथापि एक वर्ष होऊनही अद्याप मानकेश्वर येथे उपकेंद्र उभारण्यात आले नसून त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मानकेश्वर येथे उपकेंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) माणकेश्वर येथे उपकेंद्र उभारणीकरिता शासकीय/वन जमीन मिळालेली नसून खाजगी जमीन भूसंपादनाची कार्यवाही दोनदा स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन महावितरण कंपनीकडून करण्यात येत आहे. आवश्यक जमीन न मिळाल्यामुळे उपकेंद्र उभारणीस विलंब होत आहे.
(३) सदर उपकेंद्राकरिता भूसंपादन करण्याकरिता स्थानिक तहसीलदार, वन विभाग यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला. परंतु जागा न मिळाल्याने दोनदा स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली. दुस-या वेळीच्या जाहिरातीला प्रतिसाद मिळालेल्या जागा मालकाशी महावितरण कंपनीच्या परिमंडळ समितीने वाटाघाटी करुन जागेची किंमत निश्चित करण्यात आली व सद्यस्थितीत सदर प्रस्ताव मंजुरीकरिता महावितरणच्या मुख्य कार्यालयात विचाराधीन आहे. मंजुरीनंतर सदर उपकेंद्राचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात होत असलेला अनियमित वीजपुरवठा

(३५) ९३८०१ (०९-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यापासून दर दोन दिवसांनी वीज पुरवठा खंडीत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सणासुदीच्या काळात नागरिकांना या अनियमित वीज पुरवठयामुळे त्रास होत असून शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१८) : (१) यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यामध्ये माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या वादळामुळे संपूर्ण तालुक्यातील काही परिसरात झाडाच्या फांद्या तुटून विद्युत वाहिनीवर पडल्याने व तारा तुटल्याने वीज पुरवठा खंडीत होत होता. सदर वीज पुरवठा सुरळीत करण्याकरिता वीज वाहिनीवर प्रत्यक्ष काम

करण्याकरिता संबंधित वीज जाळ्यावरील वीज पुरवठा बंद करुनच कर्मचाऱ्यांना कामे करावी लागत होती. त्यामुळे काही विद्युत वितरण रोहित्रांवरील ग्राहकांचा वीज पुरवठा वीज वाहिनी दुरुस्तीच्या कालावधीमध्ये बंद ठेवणे गरजेचे होते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(३६) ९६०२८ (०२-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ३०५ कृषी उत्पन्न समिती अंतर्गत ५ हजार ५०० कर्मचारी असून सदरच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी तसेच महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ यांनी शासनाकडे माहे जून, २०१७ रोजी वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली सखोल अभ्यास करण्यासाठी दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी समितीने अहवाल शासनास सादर केला काय, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०२-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या अभ्यास समितीचा अहवाल दि. २०/११/२०१७ रोजी शासनास प्राप्त झाला असून समितीच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक टर्मिनल मार्केटचे काम पुर्ण करण्याबाबत

(३७) ९६३४३ (०३-०१-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक कृषि टर्मिनल मार्केटसाठी निश्चित केलेल्या मौजे पिंप्रीसय्यद (जि.नाशिक) येथील जागेची सहसंचालक (पणन) यांचे अध्यक्षतेखालील समितीने दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास पाहणी करुन शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने व पणन संचालनालयाने प्रस्तावित केलेली जागा महाराष्ट्र कृषी पणन मंडळास हस्तांतरित करुन या टर्मिनल मार्केटचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) खाजगी भागीदारीतून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित असल्यामुळे Business Model व प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतच्या अहवालावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १००४ सहकारी संस्थाना भाग भांडवल दिल्यानंतरही नफा जाहीर न केल्यामुळे शासनाचे नुकसान झाल्याबाबत

(३८) ९६४४० (०६-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील १००४ सहकारी संस्थाना भाग भांडवल दिले असून सदर सहकारी संस्थानी आपला नफा जाहिर न केल्यामुळे लाभांशापोटी शासनाला २८.५६ लाखांचा महसूलाचे नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मार्च, २०१६ च्या अखेरीस सहकारी निबंधकाकडे १ लाख ४० हजार ५३० सहकारी संस्थेची नोंद असून त्यांना शासन भाग भांडवल दिले जात असून, भागभांडवलाच्या रक्कमेची पूर्ण परतफेड केली जात नाही तोपर्यंत शासनाला देणे आवश्यक असूनही ती रक्कम दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०५-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
राज्यात सहकार आयुक्त योजनांतर्गत, शासकीय भागभांडवल प्राप्त संस्था १४९१ असून त्यातील १२५ संस्था हया नफयात आहेत. पैकी १२३ संस्था अल्प नफयात असल्याने या संस्थांनी लाभांश घोषीत केलेला नाही.
(२) भागभांडवल दिलेल्या संस्था हया तोटयातील,अवसायनातील,नोंदणीरद्द अशा स्वरूपाच्या आहेत. १२३ संस्था हया अत्यल्प नफयात आहेत. तथापि देवगड तालुका बलुतेदार सहकारी संस्थेने जाहीर केलेल्या लाभांशाची रक्कम रू.०.१९लाख शासनास अदा केलेली आहे. तर कोल्हापूर जिल्हयातील श्रीराम सहकारी ग्राहक भांडार मर्या, मडिलगे (बु). ता.भूदरगड

जि.कोल्हापूर या संस्थेने लाभांश घोषित केला असून संस्थेने शासकीय भागभांडवलाची रक्कम पूर्ण भरपाई केली असल्याने संस्थेला झालेल्या नफयातून शासनास लाभांश देणे लागत नाही.
(३) व (४) शासकीय अर्थसहाय्य वसूलीचा नियमित आढावा घेण्यात येतो.

जळगाव जिल्हयात आदिवासी मुला-मुलींना मिळणारी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची रक्कम जिल्हा बँकेकडे पडून असल्याबाबत

(३९) ९८३७२ (०६-०१-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात आदिवासी मुला-मुलींना मिळणारी सुवर्ण महोत्सवी मॅट्रिकपूर्व आदिवासी शिष्यवृत्तीची सुमारे ८६ लाखांची रक्कम जिल्हा बँकेकडे पडून असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्हा परिषदेने माहे मार्च, २०१७ मध्ये सदर रक्कम जिल्हा बँकेकडे धनादेशाद्वारे वर्ग केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५ महिने उलटूनही जिल्हा बँकेने लाभार्थी विद्यार्थ्यांच्या खात्यावर रक्कम वर्ग केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर शिष्यवृत्तीची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या खात्यावर तातडीने वर्ग करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम खात्यावर जमा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१७-०२-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा याकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगाव यांच्यामार्फत एकूण ६३१६० विद्यार्थ्यांच्या ईसीएस याद्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगाव यांना सादर केल्या होत्या. त्यानुसार शिक्षणाधिकारी यांच्याकडून जिल्हा बँकेमार्फत शिष्यवृत्ती लाभाच्या रकमा लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आल्या.

तथापि, ईसीएस याद्यांमध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांचे / पालकांचे बँकखाते बंद असणे, खाते क्रमांक चुकीचे असणे, खातेधारकांचे नाव चुकीचे असणे इत्यादी कारणांमुळे बँकेमार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती रकमा जमा करण्यात आल्या नाहीत. सबब, उपरोक्त त्रुटींची पूर्तता करून सुधारीत तपशीलासह यादी पुन्हा सादर करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत संबंधित शाळांच्या मुख्यध्यापकांना कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ऊस शेजारील राज्यात विकला जात असल्याबाबत

(४०) ९८४६६ (०६-०१-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस मोठ्या प्रमाणात कर्नाटकातील साखर कारखान्यांना विकला जात असल्याने याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी राज्यातील साखर गिरण्यांनी शासनाकडे केल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महाराष्ट्रातील ऊस महाराष्ट्रातच विकला जाण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) तसेच अद्यापपर्यंत शासनाने उपाययोजना केल्या नसल्यास राज्यातील गिरण्यांना ऊसाचा तुटवडा पडण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०७-०२-२०१८) : (१) होय.

(२), (३) व (४) परराज्यात ऊस निर्यात करण्यास प्रतिबंध करण्यासाठी दिनांक १० ऑक्टोंबर, २०१७ अन्वये शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. या संदर्भात परवानगी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगी शिवाय दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंत राज्याबाहेर ऊस निर्यात करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व आदिवासी बांधवांना २०१९ पर्यंत शासनाच्यावतीने स्वत:च्या मालकीचे घर देण्याबाबत

(४१) ९८८६० (०१-०१-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व आदिवासी बांधवांना २०१९ पर्यंत शासनाच्यावतीने स्वत:च्या मालकीची घरे देण्यात येतील अशी घोषणा दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे व त्या अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांचे स्वरुप कसे असेल, यासाठी किती निधीची तरतूद शासनाने केली आहे,

(३) असल्यास, या घरांच्या बांधकामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विष्णु सवरा (१६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरे बांधुन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली फेब्रुवारी,२०१५ व फेब्रुवारी २०१६ मध्ये बैठक संपन्न झाली. तसेच दि.२५/०२/२०१६ रोजी (बुर्गी, ता.एटापल्ली पोलिस ठाणेचे उदघाटन) कार्यक्रमाच्या वेळी सन २०१९ पर्यंत जिल्हयातील सर्व अ.जा. /अ.ज. अशा ज्या परिवारांच्या नांवे घर नाही. अशा सर्वांना पक्की घरे देण्यात येतील अशी घोषणा केली.

(२) अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घराचे २६९.०० चौ.फू. चटई क्षेत्र असलले पक्के घरकुल यामध्ये एक बैठकीची खोली (३.१४ x २.४५ मी.), बेडरुम (२.८२ x २.३७ मी.), स्वंयपाक घर (१.६९ x २.४५ मी.), स्नानगृह (२.०७ x१.०० मी.) व शौचालय (०.९० x १.१० मी.) याचा समावेश.

शासन निर्णय दि.०६.०१.२०१६ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण भागाकरीता शौचालय बांधकामासह प्रति घरकुल रु.१३२,०००/-(सर्वसाधारण क्षेत्राकरीता) व रु.१,४२,०००/- (नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरीता) अनुदान निश्चित करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना MGNREGA अभिसरणाद्वारे साधारण क्षेत्रासाठी रु.१७,२८०/- नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.१८,२४०/- अनुदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात शबरी आदिवासी घरकुल योजनेकरीता रु.१४०कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय आ.वि.वि.घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७ दि.१५ मार्च,२०१६ अन्वये अनुसूचित जमाती लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया करण्यात येते. शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ करीता २१०१५ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी २०४२०घरकुलांना मंजूरी दिली असून ५८३५ घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले आहे.

धर्माबाद शहर व तालुका तसेच भोकर तालुका (जि.नांदेड) येथे मोठया प्रमाणावर अवैध दारु व शिंद्री विक्री होत असल्याबाबत

(४२) ९९३८८ (२९-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद शहर व तालुका तसेच भोकर तालुका (जि.नांदेड) येथे मोठया प्रमाणावर अवैध दारु व शिंद्री विक्री होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेजारील तेलगंणा राज्यातून ही अवैध दारु , शिंद्री आणली जात असून या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार येथील अवैध दारु व शिंद्री विक्री रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०२-२०१८) : (१), (२) व (३) होय. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून धर्माबाद शहर व तालुका व भोकर तालुक्यामध्ये एप्रिल, २०१७ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत अवैध दारू व शिंद्री विक्रीबाबतचे एकूण ७९ गुन्हे नोंदविले आहेत. यामध्ये रु.१,८३,१९०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, अवैध दारू व शिंद्री बाळगणे / विक्री करणेबाबत पोलीस विभागाकडून देखील भोकर तालुका, धर्माबाद तालुका तसेच संपूर्ण नांदेड जिल्हयासाठी एप्रिल, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत वेळोवेळी क्रॅक डाऊन ऑपरेशन राबविण्यात येवून दोषी व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. अवैध दारू व शिंद्री बाळगणे, वाहतूक व विक्रीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागामार्फत वेळोवेळी विशेष छापे मोहिम राबवून कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यातील एम.आय.डी.सी. मध्ये अनेक उद्योजकांनी जागा आरक्षित करून उद्योगधंदे चालू न केल्याबाबत

(४३) १००५२६ (०३-०१-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यातील एम.आय.डी.सी. मध्ये अनेक उद्योजकांनी जागा आरक्षित करून कोणताच उद्योग चालू केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन उद्योजकांना अंजनगाव सुर्जी येथिल एम.आय.डी.सी. मध्ये जागेची मागणी करून सुद्धा जागा मिळत नाही, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, उद्योग न उभारणाऱ्या उद्योजकांवर तसेच नवीन उद्योजकांना उद्योग उभारणी करिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०८-०२-२०१८) : (१) हे खरे नाही

अंजनगाव सुर्जी लघु औद्योगिक क्षेत्रात एकूण २७ भूखंड पाडलेले असून त्यापैकी २६ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. १५ भूखंडावर उत्पादन सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अंजनागाव सुर्जी लघु औद्योगिक क्षेत्रात वाटपाकरिता भूखंड शिल्लक नाही. तथापि वाटप केलेल्या ६ भूखंड धारकाने विहित वेळेत उद्योग उभारणी न केल्याने पंचनामा करुन ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. भूखंड परताव्याची रक्कम परत केल्यानंतर महामंडळाच्या धोरणानुसार भूखंड वाटपास उपलब्ध होतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ऊस तोडणी कामगारांचे दर वाढविण्याबाबत

(४४) १००५६१ (०३-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस तोडणी कामगारांचे दर वाढविण्यात यावेत अशी मागणी ऊस वाहतूक संघटनानी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०७-०२-२०१८) : (१) होय.

(२) ऊस तोडणी कामगारांचे दरवाढीबाबत महाराष्ट्र ऊस तोडणी व वाहतुक कामगार संघटना यांचे दि.३ ऑगस्ट, २०१७ चे निवेदन प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने मा.मंत्री (सहकार) महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.११ ऑक्टोबर, २०१७ रोजी महाराष्ट्र ऊस तोडणी व वाहतुक कामगारांच्या मागणीबाबत संघटनेचे प्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाचे पदाधिकारी यांचेसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. ऊस तोड कामगारांचे दरवाढीबाबत लवादाने दि.२४.१०.२०१५ रोजी ऊस तोडणी व वाहतूक शेतमजूरांचे दर व सेवा सवलतीबाबत नवीन दर हंगाम २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ हंगामाकरिता निश्चित केलेले आहेत. यानुसार ऊस तोडणीचे दर २० % वाढ करण्यात आली आहे. लवादाच्या निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने इयत्ता ९ वी ते १२ वीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीची आम आदमी विमा योजना बंद केल्याबाबत

(४५) १०१३७० (०६-०१-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने इयत्ता ९ वी ते १२ वीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीची आम आदमी विमा योजना बंद केल्याने विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु.१०० इतका मिळत असलेला लाभ बंद झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील अल्प भुधारक शेतकरी वा भूमिहीन कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना लाभ दायी होती परंतू सदरहू योजना बंद केल्याने गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाची आम आदमी विमा योजना राज्यात दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ पासून राबविण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

औद्योगिक सहकारी वसाहत (जि.लातूर) येथे उद्योग संचालनालयाच्या मालकीच्या भूखंडावर अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम केल्याबाबत

(४६) १०१६९३ (०३-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक सहकारी वसाहत (जि.लातूर) येथे उद्योग संचालनालयाच्या मालकीच्या भूखंडावर लातूर अर्बन बँकेची इमारत, शॉपिंग सेंटर व फ्लॅट सिस्टीम इमारती अनधिकृतपणे बांधल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०२-२०१८) : (१) लातूर सहकारी औद्योगिक वसाहतीच्या जागेवर अर्बन बँकेची इमारत, शॉपिंग सेंटर व इमारतीचे बांधकाम झाले आहे. याबाबत उद्योग संचालनालयाची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. प्रस्तुत प्रकरणात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी चालू आहे.

(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी चालू आहे.

वाशिम जिल्हयात नाफेडने केलेल्या तूर खरेदीची देय रक्कम अद्याप प्रलंबित असल्याबाबत

(४७) १०१७६७ (०३-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात नाफेडने केलेल्या तूर खरेदीचे १४ कोटी ४४ लाख रुपयांचे देय रक्कम अदयाप प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील २७६ कोटी रुपयांची रक्कम २६ मे पर्यतची असून उर्वरित ११६८ कोटी रुपयांची रक्कम २७ मे ते ३ जून या कालावधीमधील आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील शेतकऱ्यांचे तूरविक्रीचे थकीत चूकारे तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०७-०२-२०१८) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये दिनांक २४/१२/२०१६ ते दिनांक ३१/०८/२०१७ या कालावधीत वाशिम जिल्ह्यात खरेदी केलेल्या एकूण ४.९१ लाख क्विंटल तूरीची देय रक्कम रुपये २४७.९० कोटी होते. मे, २०१७ अखेरपर्यत रुपये ९६.७७ कोटी एवढी रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे. तद्नंतर उर्वरित शिल्लक रक्कम टप्प्याटप्प्याने दिनांक १३/१०/२०१७ पर्यत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मोजे कोरटा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे आदिवासी सांस्कृतिक सभागृहासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

(४८) १०२११७ (२९-१२-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरटा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे आदिवासी सांस्कृतिक सभागृह उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून रु. १ कोटीचा निधी उपलब्ध करुन देणेबाबत अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस सदरचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत व सदरचा निधी कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल ?

श्री. विष्णु सवरा (०८-०२-२०१८) : (१) होय.

मौजे कोरटा (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथे आदिवासी सांस्कृतिक संकूल बांधण्याच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत दि.३०.१२.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) होय.

(३) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी मौजे कोरटा, ता.उमरखेड जि.यवतमाळ येथे सांस्कृतिक सभागृह बांधकामाचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयाकडे दिनांक १४.१२.२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयाकडून सुरु आहे.

औद्योगिक भूखंडासाठी अर्ज करणाऱ्या उद्योजकांना भूखंड वाटप करण्याबाबत

(४९) १०३०१५ (०३-०१-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक भूखंड वाटपासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाने सन २०१४ मध्ये ऑनलाईन प्रक्रिया सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रक्रियेंतर्गत भूखंड मागणीसाठी उद्योजकांनी केलेल्या अर्जानुसार भूखंड वाटप न करता दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सर्व अर्ज रद्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ पासून औद्योजिक भूखंडासाठी अर्ज करणाऱ्या उद्योजकांना तातडीने भूखंड वाटप करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०९-०२-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

मात्र अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक भूखंड क्रमांकासहीत नियोजन आराखडे मंजुर नसल्याने भूखंडाचे वाटप करता आलेले नाही. तसेच भूखंड क्रमांकासहित मंजुर असलेले भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे महामंडळाचे पत्र दिनांक २६/०४/२०१६ अन्वये अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

(३) सद्यस्थितीत महामंडळाचे ई अलॉटमेट धोरणानुसार भूखंड वाटपाची प्रक्रिया आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळामधील शिक्षकांसाठीही शिक्षण पात्रता परिक्षा बंधनकारक करण्याचा निर्णय आदिवासी विभागाने घेतल्याबाबत

(५०) १०३२१८ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागाप्रमाणे राज्यातील आश्रमशाळामधील शिक्षकांसाठीही शिक्षण पात्रता परिक्षा बंधनकारक करण्याचा निर्णय आदिवासी विभागाने घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण पात्रता परिक्षा घेण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून शिक्षक पात्रता परिक्षा त्वरित घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३०-०१-२०१८) : (१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणे राज्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळामधील प्राथमिक शिक्षकांसाठीही शिक्षक पात्रता परिक्षा बंधनकारक करण्याचा निर्णय आदिवासी विभागाने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

तसेच जे शिक्षक दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ नंतर नियुक्त झाले आहेत परंतू शिक्षक पात्रता परिक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत, अशा शिक्षकांना दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शिक्षक पात्रता परिक्षा प्रथम ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(२) शिक्षक पात्रता परिक्षा ही शालेय शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात येते. सदर परिक्षा बंधनकारक करण्यात आल्यानंतर शासनाकडून दरवर्षी शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.